




दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थ्यांचे
आयुष्य उजलवत असतो...

वर्ष : ०५ | अंक : २५१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.२३ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ५१ वर्षीय महिलेच्या आत्महत्येच्या प्रकरणाला तपासादरम्यान नवे वळण



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, नागपूर :** नागपूर शहरातील बजाजनगर परिसरात घडलेल्या ५१ वर्षीय महिलेच्या आत्महत्येच्या प्रकरणाला तपासादरम्यान नवे वळण मिळाले आहे. सुरुवातीला आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद झालेल्या या घटनेत आता लिव्ह-इन साथीदाराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नातेवाईकांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे पोलिसांनी तपासाची दिशा बदलत अधिक सखोल चौकशी सुरू केली आहे. रेश्मा शशिकांत रेवतकर असे मृत महिलेचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या महिलेचा २०१९ मध्ये पतीशी घटस्फोट झाला होता. त्यानंतर ती शशांक गजभिये या व्यक्ती सोबत राहत होती. काही काळ सर्व काही सुरळीत असले तरी पुढे दोघांमध्ये वारंवार वाद होऊ लागल्याची माहिती समोर आली आहे. या वादांचे कारण संशय आणि परस्पर अविश्वास असल्याचे सांगितले जात आहे. मृत महिलेच्या कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दाखल करताना आरोप केला की, आरोपी सातत्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. तसेच तो तिच्यावर मानसिक दडपण आणत असे आणि वेळोवेळी शारीरिक अत्याचारही करत होता. गेल्या काही महिन्यांत हा त्रास अधिक वाढल्याचं नातेवाईकांचं म्हणणं आहे. १० एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास महिला आपल्या राहत्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरून खाली उडी मारल्याची माहिती समोर आली. घटनेनंतर तिला तातडीने नागपुरातील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती.

प्रारंभी पोलिसांनी 'ॲक्सिडेंटल डेथ' (एडी) म्हणून नोंद करत तपास सुरू केला होता. मात्र, नातेवाईकांच्या तक्रारीनंतर आणि प्राथमिक चौकशीत समोर आलेल्या बाबींमुळे पोलिसांनी प्रकरणाचा पुनर्विचार केला. त्यानंतर भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमानुसार आरोपीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलिसांकडून आरोपीची चौकशी सुरू असून, घटनेच्या पार्श्वभूमीवर साक्षीदारांचे जबाब नोंदवले जात आहेत. तसेच मोबाईल कॉल रेकॉर्ड, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुरावे तपासले जात आहेत.

# मुख्यमंत्र्यांच्या पाणी जपून वापरण्याच्या सूचना...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, मुंबई :** राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमततेमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा आणि एल-निनो प्रभावामुळे संभाव्य परिणामांची माहिती दिली.

एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याच दिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे.

गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. यावर राज्यातील पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून ऑगस्ट २०२६ अखेर पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपायोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्यासोबतच एल-निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीने आतापासून पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. महसूल विभागनिहाय पाणीसाठा :

नागपूर : धरण संख्या - ३८७, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ८०.७९, गतवर्षीचा पाणीसाठा - ६३.४० टीएमसी

अमरावती : धरण संख्या - २७६, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ७३.७२, गतवर्षीचा पाणीसाठा - ६५.१३ टीएमसी

छत्रपती संभाजीनगर : धरण संख्या - ९२९, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १२९.३७, गतवर्षीचा पाणीसाठा - ९७.०९ टीएमसी

नाशिक : धरण संख्या - ५३९ , यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १०१.९६, गतवर्षीचा पाणीसाठा - ८९.२८ टीएमसी

पुणे : धरण संख्या - ७२४, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - २०६.५५, गतवर्षीचा पाणीसाठा - १७४.०४ टीएमसी



कोकण : धरण संख्या - १७३, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ६१.२४, गतवर्षीचा पाणीसाठा - ६२.९२ टीएमसी

एकूण : धरण संख्या - ३०२८, यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ६५३.६३, गतवर्षीचा पाणीसाठा - ५५१.८६ टीएमसी

राज्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा : (टिएमसीमध्ये)

कोयना : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ३३.६२, गतवर्षीचा पाणीसाठा ३६.७६ टिएमसी.

जायकवाडी : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ४२.०३, गतवर्षीचा पाणीसाठा ३४.४४ टिएमसी.

उजनी : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १३.३९, गतवर्षीचा पाणीसाठा - (०)

पेंच प्रकल्प समूह : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - २६.५७, गतवर्षीचा पाणीसाठा २६.३५ टिएमसी.

इसापूर : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - २१.४५, गतवर्षीचा पाणीसाठा १७.८२ टिएमसी.

भातसा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १५.७०, गतवर्षीचा पाणीसाठा १४.९१ टिएमसी.

गोसीखुर्द : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १४.३१, गतवर्षीचा पाणीसाठा ५.९३ टिएमसी.

खडकवासला धरण समूह : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ११.३२, गतवर्षीचा पाणीसाठा ९.८२ टिएमसी.

मुळा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - ९.५४, गतवर्षीचा पाणीसाठा १०.५३ टिएमसी.

अप्पर वर्धा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा - १०.२१, गतवर्षीचा पाणीसाठा ९ टिएमसी.

## राज्यात पुढील चार दिवस पावसाची शक्यता, वादळी वाऱ्यासह गारपीट होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पुणे :** राज्यात अनेक ठिकाणी गेल्या काही दिवसांपासून कडाक्याचं ऊन पडत आहे. असं असलं तरी काही ठिकाणी आता वातावरणात बदल होताना दिसत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण बघायला मिळत आहे. काही ठिकाणी अजूनही कडाक्याचं ऊन पडत आहे. पण हे ऊन कमी होऊन अवकाळी पाऊस बरसण्याची शक्यता आहे. राज्यात पुढील चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुढच्या पाच दिवसांमध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह गाारपीटची शक्यता आहे. पुणे हवामान विभागाकडून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भ, मराठवाड्यात गारपीट होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून पुढच्या चार दिवसांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**पुण्यात अनेक भागांमध्ये गारपीट**

राज्यात अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात तापमानाचा पारा हा ४० वर गेला होता. पण आज अचानक तापमानात बदल झाला आणि पावसाने एन्ट्री घेतली. पुण्यातील अनेक भागांमध्ये आज गारांचा पाऊस पडला. अचानक आलेल्या गारांच्या पावसामुळे नागरीक धास्तावले. गारपीटमुळे काही काळ वाहतूक कोंडीची समस्या देखील उद्भवली. तसेच पुण्यात काही ठिकाणी पाऊस देखील पडला. पुढचे चार दिवस हा पाऊस ठाण मांडून राहण्याची शक्यता आहे.

**मुंबईतही पाऊस पडणार**

मुंबईत यंदा अवकाळी पाऊस पडलेला बघायला मिळाला नव्हता. पण आता मुंबईतही पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबईत २३ आणि २५ एप्रिल या दोन दिवशी दमट हवामान राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड गरमी होण्याची शक्यता आहे. तसेच २४ एप्रिलला अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या दिवशी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**हवामान विभागाचा अंदाज नेमका काय?**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २३ आणि २४ एप्रिल या दोन दिवशी ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये वातावरण हे उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. तसेच दुपारनंतर वातावरणात बदल होण्याची शक्यता आहे. या जिल्ह्यांमध्ये दुपारनंतर हलक्या सरींची किंवा विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुण्यात पुढचे तीन दिवस सातत्याने अवकाळी पाऊस बरसण्याची शक्यता आहे. पुण्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात २४ आणि २५ एप्रिलला पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांमध्ये पुढचे तीन दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यात पुढचे दोन दिवस पावसाची शक्यता आहे. परभणी जिल्ह्यात २५ एप्रिलला पाऊस पडण्याची शक्यता आहे. बीड जिल्ह्यात २४ एप्रिलला पाऊस पडण्याची शक्यता आहे.

नांडेड जिल्ह्यात २३ आणि २५ एप्रिलला पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर लातूर जिल्ह्यात २५ तारखेपर्यंत पावसाची शक्यता आहे. धाराशिवमध्ये पुढचे दोन दिवस पावसाची शक्यता आहे.

# महिला खासदाराचा अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द तक्रार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२१, चंद्रपूर :** खासदार प्रतिभा धानोरकर यांनी चंद्रपूर जिल्हा प्रशासनाविरुध्द लोकसभा अध्यक्षांकडे गंभीर तक्रार दाखल केली आहे. दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी आयोजित ' राजमाता राणी हिराई जन्मोत्सव' या शासकीय कार्यक्रमात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी राज शिष्टाचाराच्या (प्रोटोकाल) सर्व नियमांना धाब्यावर बसवून एका महिला खासदाराचा आणि संसदेच्या प्रतिष्ठेचा जाणिवपूर्वक अवमान केल्याचा आरोप त्यांनी पत्राद्वारे केला आहे.



या कार्यक्रमात केंद्र व राज्य सरकारच्या 'ऑर्डर ऑफ प्रेसिडेन्स' नुसार खासदारांचा दर्जा व भाषण क्रम निश्चित असतानाही, प्रशासनाने कमालीचा पक्षपातीपणा दाखवला. खासदार महोदयांचे भाषण सुरु असतानाच एका आमदाराला जाणीवपूर्वक वाजत-गाजत मंचावर आणले गेले, ज्यामुळे गोंधळ निर्माण होऊन खासदारांना आपले भाषण मध्येच थांबवावे लागले. हा प्रकार केवळ तांत्रिक चूक नसून एका लोकप्रतिनिधीला सार्वजनिकरित्या अपमानित करण्याचा पूर्वनियोजित कट असल्याचे खासदार प्रतिभा धानोरकप यांनी म्हटले आहे. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांसह संबंधित यंत्रणेने सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली काम केल्याचेही या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

निमंत्रण पत्रिकेत नाव नसलेल्या आणि कोणतेही घटनात्मक पद धारण न करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांचा मंचावरील वावर आणि हस्तक्षेपामुळे, शासकीय निधीतून होणाऱ्या या सोहळ्याचे रुपांतर एका विशिष्ट राजकीय पक्षाच्या खाजगी मेळाव्यात करण्यात आले.

या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन हे प्रकरण तातडीने संसदेच्या 'विशेषाधिकार समिती' कडे वर्ग करण्याची आग्रही मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे. अधिकारांचा गैरवापर करणाऱ्या आणि शिष्टाचाराचे उल्लंघन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर कठोर दंडात्मक व सेवाशर्तीनुसार कारवाई करावी, जेणेकरुन भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही आणि संसदेच्या सर्वोच्च प्रतिष्ठेचे रक्षण होईल, असे त्यांनी पत्रात शेवटी म्हटले आहे.

## नाशकात बिबट्याच्या हल्ल्यात २ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू; परिसरात हळहळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, दिंडोरी :** तालुक्यातील वलखेड येथे मंगळवारी रात्री बिबट्याने शेतमजुराच्या दोन वर्षांच्या चिमुरडीला शेतात ओढून नेले. यात ज्ञानेश्वरी मोरे या चिमुरडीचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पंचनामा करीत शेतात पिंजरा लावला.

वलखेड येथे बळवंत शिंदे यांच्या शेतात विलास गिरिधर मोरे हे शेतमजुरी करतात. मंगळवारी रात्री घरासमोरील शेडमध्ये आई-वडील आणि त्यांची दोन वर्षांची मुलगी ज्ञानेश्वरी बसलेले होते. यावेळी शेजारी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक ज्ञानेश्वरीवर झडप घातली. तिला जबड्यात पकडून शेतात ओढून नेले. हे पाहताच शेजारी व परिसरातील नागरिकांनी आरडाओरड केली. मात्र, बिबट्या बालिकेला घेऊन अंधारात पसार झाला होता. बालिकेचे शव उत्तरीय तपासणीसाठी दिंडोरीच्या ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. त्यानंतर रात्री शोकाकुल वातावरणात ज्ञानेश्वरीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. वनक्षेत्र अधिकारी सुशांत पाटील, वनपाल भट्ट, वनरक्षक गोरख गांगोडे आदींनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यानंतर घटनास्थळी पिंजरा लावण्यात आला. या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.



**बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार**

येवला : तालुक्यातील चिचोंडी बुद्रुक येथे बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार बिबट्याचे दर्शन होत आहे. वनविभागाने दोन ठिकाणी पिंजराही लावला. मात्र, बिबट्या पिंजऱ्यात कैद झाला नाही. शेतकरी निवृत्ती पांडुरंग मढवई यांनी आपल्या मोकळ्या झालेल्या कांद्याच्या शेतात गाय बांधून ठेवली होती. बुधवारी (दि. २२) पहाटेच्या सुमारास बिबट्याने या गायीवर हल्ला केला. हल्ल्यात गाय ठार झाली. सदर घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे पंकज नागपुरे, भाऊसाहेब माळी, गणेश चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करीत पंचनामा केला. वनविभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी राजाराम मढवई, नामदेव मढवई, भागवत खराटे, संदीप खराटे यांनी केली आहे.




## अनुदान बंद झाल्यानंतर...

सरकारने मध्यंतरी दोन आदेशांद्वारे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या अनेक वर्षांपासून विनाअनुदान तत्त्वावर काम करणारे अनेक शिक्षक आणि संस्थांचे भवितव्य अंधकारमय दरीत लोटले आहे. या संस्था आणि संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची अनुदानाची दारे आता कायमस्वरूपी बंद झाली आहेत. सन २०११च्या शासन निर्णयानुसार, तीन वर्षांत शाळा अनुदान निकष पूर्ण न केल्यास शाळा बंद करणार, असे जाहीर केले होते. ही कृती वेळीच झाली असती तर पुढील बारा वर्षांची फरफट तरी टळली असती.

'विनाअनुदान' या शब्दाचा शिक्षण क्षेत्रातील प्रवेश १९८३मध्ये झाला. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण घेण्यास उत्सुक विद्यार्थी आपल्या राज्यात प्रवेशाच्या संधी कमी असल्याने अन्य राज्यांत शिक्षणासाठी जात होते, हे लक्षात घेऊन त्यासाठी विनाअनुदान तत्त्वाची कल्पना पुढे आली. ४२व्या घटना दुरुस्तीमुळे शिक्षणाचा समावेश समावर्ती यादीत झाला, तर ८६व्या घटना दुरुस्तीमुळे त्याला मूलभूत हक्काची मान्यता मिळाली. शासकीय अनुदानाआधारे चालणाऱ्या शिक्षण व्यवस्थेत १९८९पासून 'अनुदान टप्पा सूत्र' सुरू झाले.

शाळा सुरू झाल्यावर दहावीच्या निकालावर आधारित तेथून पुढे २५- ५० -७५ -१०० टक्के असा प्रवास करत साधारण सात ते आठ वर्षांत शाळा पूर्ण अनुदानावर येण्याचे धोरण निश्चित झाले. मात्र, सुरुवातीला काही 'भाग्यवंत शाळा' या धोरणानुसार अनुदानावर आल्या. अनुदान हा स्वेच्छा अधिकार असल्याने आणि विशेष आपत्तीचा निधी अन्य ठिकाणी वर्ग झाल्याने अनुदानापासून वंचित अनेक शाळा १९९५च्या सुमारास अनुदानावर आल्या. ११ ऑक्टोबर २००० रोजी या टप्पा प्रकारात बदल करून तो २०- ४०- ६०- ८०- १०० असा करण्यात आला. यावेळी आदिवासी शाळांना काही सवलती देण्यात आल्या. अनुदानावर येण्यासाठी १०० गुणांचे निकष जाहीर करण्यात आले. यामध्ये उपस्थिती-प्रति इयत्ता ३५चा पट धरून विद्यार्थी उपस्थिती (२० गुण), दहावी निकाल (३० गुण), नागरी क्षेत्र (१० गुण ), विद्यार्थी आर्थिक स्तर (१० गुण) आणि सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा (३० गुण) या निकषांवर शाळेच्या अनुदानाचे भवितव्य ठरेल, असे जाहीर झाले. याबरोबरच शाळा जरी अनुदानास पात्र झाली तरी निधी उपलब्धतेनुसार अनुदान मिळेल व त्यात कोणतेही थकीत वेतन मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. याच प्रवासात २४ नोव्हेंबर २००१ मध्ये 'कायम विनाअनुदान तत्त्व' ही वेगळीच संकल्पना अस्तित्वात आली.

१७ फेब्रुवारी २००४च्या शासन निर्णयानुसार अनुदानास पात्र शाळांची यादी घोषित करण्यात आली. २० जुलै २००९च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळता प्राथमिक, माध्यमिकमधील 'कायम' शब्द काढून टाकण्यात आला आणि अस्तित्वात असणाऱ्या शाळा २०१२- १३ पासून मूल्यांकनास पात्र होतील, असे जाहीर करण्यात आले. १५ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयानुसार अनुदानाच्या निकषात बदल करण्यात आला. गुणवत्ता (५०), भौतिक सुविधा (३५) यासोबतच समुपदेशन (३), सामाजिक विकास उपक्रम (३), सहशालेय उपक्रम (५) आणि इको फ्रेंडली रेन वॉटर पारंपारिक ऊर्जा आणि पाण्याचा पुनर्वापर (४) अशी १०० गुणांची रचना झाली. मुळातच कोणतीही शैक्षणिक संस्था चालवण्यासाठी धर्मादाय आयुक्त आणि सार्वजनिक न्यास यांच्या १८६० आणि १९५०ची नोंदणी असणाऱ्या संस्था असणे आवश्यक आहे. त्यानंतर शाळेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे, इमारत व अन्य भौतिक सुविधा, फर्निचर, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य या गोष्टींसाठी खूप मोठी प्रक्रिया आणि आर्थिक गुंतवणूक करावी लागते. तसेच शिक्षक नियुक्ती व मासिक वेतन हाही भाग आहेच. राज्याच्या एकूण शिक्षण व्यवस्थेचा विचार केल्यास प्राथमिक शाळा बहुतेक करून शासकीय नसून त्या अर्धशासकीय म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आहेत. तर, संपूर्ण महाराष्ट्रात काही स्थानिक स्वराज्य संस्थांचा अपवाद वगळता सराव पाठशाळा आणि पाच शासकीय विद्यानिकेतने सोडून संपूर्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण खासगी संस्थांच्या शाळांतूनच देण्यात येते. शिक्षणाची तळमळ असणाऱ्या संस्थांनी शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचावे, यासाठी खासगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे प्रभावी जाळे निर्माण केले. वाडी वस्तीपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी वस्ती शाळा, साखर शाळा यांचीही निर्मिती झाली. पण हे करून आपण चूक केली की काय, असा प्रश्न संस्थांच्या मनात यावा, अशी स्थिती शासनाच्या अनेक ध्येय-धोरणांमुळे निर्माण झाली आहे.

**- महेंद्र गणपुले**

# पहलगामची 'अनसुलझी' पहेली...



**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**



२४ एप्रिल २०२४ चा तो दिवस ज्या दिवशी धर्तीवरील स्वर्ग समजल्या जाणाऱ्या जम्मू आणि काश्मीर मधील बेसरन घाटीत पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबारात सव्वीस जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला या घटनेने अख्खा देश हादरला. ज्या पहलगाम जवळ ही दहशतवादी घटना घडली ती काही सीमेवर किंवा सीमे जवळपास नव्हती तर सीमावर्ती भागातुन जवळपास चाळीस किलोमीटर आत होती. पहलगाम जवळच्या मिनी स्वित्झर्लंड येथे निसर्गाचा आनंद लुटत हजारो पर्यटक आनंद लुटत होते कुणालाही पुसटशी कल्पना नसेल कि सीमेपलिकडुन काही यमदुत येतील आणि अंदाधुंद गोळीबार करतील मात्र दुर्दैवाने ते आले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला, त्यात जवळपास २६ पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. या घटनेने देशाला हादरवून सोडले . धर्मांधतेने पछाडलेल्या या माणुसकी शुन्य नराधमांनी यावेळी पहिल्यांदाच धर्म विचारला गेला, विश्वास वाटावा म्हणून कलमा पढायला लावला, अजान म्हणायला लावली आणि आपल्या धर्माचा नाही म्हणून बेछूट गोळीबार करत अनेकांना बेरहम पणे मारले.अनेकांना नातेवाईकांच्या समोरच गोळ्या घालून ठार केले, आपल्या डोळ्यासमोर आपल्या घरातील एका व्यक्तीची हत्या होतांना ऊघड्या डोळ्यांनी पहावे लागेल यापेक्षा दुर्दैव ते काय? सहा दिवसांपूर्वी लग्न झालेल्या नववधुवर हनिमूनला गेले असतांना आपल्या पतीचे कलेवर पहावे लागते हे अतिशय दुर्दैवी आहे. महाराष्ट्रातील सहा जणांचा देखील यात मृत्यू झाला आहे आणि अनेकांचे कुटुंब ऊद्धस्थ झाले आहे. यामुळेच या घटनेची तीव्र प्रतिक्रिया देशभर ऊमटत आहे. पस्तीस वर्षांनंतर पहिल्यांदा काश्मीर घाटीतील जनतेने रस्त्यावर उतरून या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आणि आम्ही भारतीय एक आहोत हे दाखवुन दिले. विशेष म्हणजे काश्मीर मधील जनतेने आपण भारतीय आहोत हे दाखवुन देतांना पर्यटकांना धीर दिला सर्वतोपरी मदत केली आहे, मानसिक आधार दिला दहशतवाद्यांचा बाहेर येऊन ऊघडपणे निषेध करत हिंदु मुस्लिम एकतेचे दर्शन घडवले आहे. त्या नंतर काश्मीरी जनतेने काश्मीरीयतचे दर्शन घडवले. २०१९ मधे पुलवामा घटना घडली त्यात जवानांना घेऊन जाणाऱ्या गाडीला स्फोटकांनी बॉम्बस्फोट करुन ऊडवले त्यात देशाचे चाळीस जवान शहीद झाले कालांतराने भारतीय लष्कराने घर मे घुसकर पाक पुरस्कृत दहशतवाद्यांना मारले त्यांचे तळ ऊद्वस्त केले. या वेळी देखील अशीच जनभावना होती आणि सात मे ला आपल्या लष्कराने पाक पुरस्कृत दहशतवाद्यांवर हल्ला चढविला मात्र हल्ला निर्णयकी ठरत असतांना ९ मे ला अचानक सिझफायर मान्य करण्यात आला विशेष म्हणजे सीजफायर ची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केली आणि ती भारत पाक यांनी मान्य केली, यावरून बरेच राजकारण झाले आजही होत आहे. ऑपरेशन सिंदुर अजुनही संपले आहे कि सुरु आहे यात स्पष्टता नाही.

आजचा नया भारत घर ते घुसकर मारने वाला है असे छातीठोकपणे सांगितले जाते आणि अनेकदा तसे दिसलेल आहे, जिवितहानी, वित्तहानी च्या रुपात जे नुकसान व्हायचे ते झालेच आहे मात्र ज्या प्रमाणे पुलवामा घटनेच्य ववेळी आरडीएक्स आले कुठुन? आरडीएक्स ने भरलेले वाहन कोणाचे याबाबत काहीच माहिती देशाला मिळत नाही कि या निष्पक्षपातीपणाला जबाबदार कोण हे पुढे येत नाही त्याच प्रमाणे पहलगाम घटनेच्या बाबतीत देखील सुरक्षा यंत्रणांचा दोष होता कि नव्हता, घटनेला जबाबदार कोण, इतक्या आतमधे हत्यारबंद अतिरेकी आलेच कसे, बेसरन घाटीत सुरक्षा व्यवस्था का नव्हती असे अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. पुलवामा प्रमाणेच पहलगाम ची घटना देखील एक अनसुलझी पहेली बनणार का?. कलम ३७० मधील काही कलम तसेच ३५-अ कलम हटवल्यनंतर अनेक दावे प्रतिदावे केले गेले त्याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय?

# पाटणकरांना समस्या निर्माण होणार नाहीत यासाठी प्रयत्न करा - याज्ञसेनसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** पाटण शहरातील कचरा डेपो आणि त्याचे व्यवस्थापन याची प्रत्यक्ष पहाणी करत कचरा डेपो परिसरातील नागरिकांना याचा त्रास होणार नाही. यासाठी नगरपंचायतीने योग्य कारवाई करण्याच्या सुचना युवा नेते याज्ञसेनसिंह पाटणकर यांनी पाटण नगरपंचायतीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना दिल्या. यावेळी प्रभाग क्रमांक - ९ मधील इंदिरानगर, विक्रमनगर परिसरातील रस्ते, नाले सफाई, याची प्रत्यक्ष पहाणी करत प्रभाग मधील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी नागरिकांनी त्यांच्यासमोर समस्यांचा पाढाच वाचला. गेली १० वर्षे नगरपंचायती कडून दुर्लक्षित राहिलेला प्रभाग क्रं- ९ हा मी स्वतः दत्तक घेतल्याची घोषणा युवा नेते याज्ञसेनसिंह पाटणकर यांनी यावेळी केली. येथून पुढे या प्रभागात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत असा विश्वास त्यांनी यावेळी उपस्थित नागरिकांना दिला.

भारतीय जनता पक्षाचे सातारा जिल्हा सरचिटणीस युवा नेते याज्ञसेनसिंह पाटणकर यांनी पाटण शहरातील नागरिकांना भिडसावणाऱ्या समस्या बाबत प्रभागवार आढावा बैठका घ्यायला सुरुवात केली आहे. प्रभाग क्रं- ९ ची आढावा बैठक सुलोचनाबाई पाटणकर कन्या शाळा, पाटण येथे सोमवारी सायंकाळी घेण्यात आली. यावेळी पाटण नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, माजी उपनगराध्यक्ष सागर पोतदार, नगरसेवक राजेंद्र गायकवाड, स्वप्नील माने, शशिकांत देवकांत यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी युवा नेते याज्ञसेनसिंह पाटणकर यांनी प्रथम प्रभाग मधील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या जाणून घेत असताना इंदिरानगर, विक्रमनगर परिसर गेली दहा वर्षे नगरपंचायतीच्या विकासात्मक कारभारापासून दुर्लक्षित राहिला असल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता हा विभाग मी दत्तक घेत असल्याचे जाहीर केले. यावेळी बोलताना ते म्हणाले पाटण शहरातील प्रत्येक प्रभाग अथवा विभागाचा आढावा घेत असताना प्रत्येक ठिकाणी नगरपंचायती कडून विकासात्मक कामे झाली आहेत. मात्र या ठिकाणी नगरसेवकच सक्षम नसल्याने या ठिकाणी कामांचा अभाव दिसतो. येथून पुढे या प्रभागात दुर्लक्ष होणार नाही. टप्प्याटप्प्याने सर्व विकासात्मक कामांचा निपटारा केला जाईल. प्रभाग दत्तक घेत असताना त्या कामाची सुरुवात मी आज पासूनच करतो असे सांगत याज्ञसेनसिंह पाटणकर यांनी प्रभाग क्रं- ९ मधील विक्रमनगर, इंदिरानगर परिसराला मंगळवारी सकाळी भेट देत प्रभागाची पाहाणी केली व नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी प्रभागातील नागरिक युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## खरा समारंभ

नाजूकक्षणे व्यापला
खरा निरोप समारंभ
एक जिम्मेदारी सरते
नव्याकार्याचा आरंभ

भावनाविवश दिवस
बोलू लागे मुख स्तंभ
मोकळेपणानेचालले
कुणी न करे अवष्टंभ

फोटोसेशन वेळसाधे
मध्येचं घुसे उपटसुंभ
जीवलग दोस्तनिवृत्त
जागृत करतो विश्रंभ

खुर्चीवरी असे जेंव्हा
अंगात उसळला दंभ
अधिकार अधि राज्य
उन्मळला अहम् कुंभ

सत्तेवरून पाय उतार
तरीही न उतरलाजंभ
सत्तापाठबळ निखळे
भुस भुशीत रे उपष्टंभ

निर्वाण मार्गे परिक्रमा
नवीन आयुष्य प्रारंभ
नव्याव्याधी मित्रासम
आजारपण दे परिरंभ

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# जागतिक पुस्तक दिन

आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे (९९२२५४६२९५)**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# महाबळेश्वर येथे विविध विकासकामांचे मंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते लोकार्पण




**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२२, महाबळेश्वर (सातारा)** : जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या महाबळेश्वरच्या सौंदर्यात आणि पर्यटन सुविधांमध्ये आणखी भर पडली आहे. महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेच्या वतीने शहरात राबविण्यात आलेल्या विविध महत्त्वाकांक्षी विकासकामांचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यामुळे महाबळेश्वरच्या पर्यटनाला नवी झळाळी मिळणार असून, शहराच्या ऐतिहासिक आणि आधुनिक वैभवाचा संगम या प्रकल्पांमधून दिसून येत आहे.

**लोकार्पित करण्यात आलेले प्रमुख प्रकल्प :-**

१) क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर महाराज चौक :- माखरीया उद्यान परिसरातील या चौकाचे भव्य सुशोभीकरण करण्यात आले आहे. यामुळे परिसराच्या सौंदर्यात मोठी भर पडली असून पर्यटकांचे हे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

२) ऐतिहासिक पेटीट लायब्ररीचा जिर्णोद्धार :- नगरपरिषदेच्या मालकीच्या या ऐतिहासिक वास्तूचे जुने वैभव जपून तिचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. लायब्ररीच्या बाहेरील मोकळ्या जागेचेही सुशोभीकरण झाल्याने ही वास्तू आता नव्या स्वरूपात पर्यटकांच्या सेवेत रुजू झाली आहे.

३) वेण्णा लेक फ्लोटिंग जेट्टी :- पर्यटकांचे आवडते केंद्र असलेल्या वेण्णा लेक बोट क्लब येथे अद्ययावत 'फ्लोटिंग जेट्टी' बसवण्यात आली आहे. यामुळे पर्यटकांचा नौकाविहाराचा अनुभव अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे.

**शाश्वत विकासाचा ध्यास - मकरंद पाटील**

याप्रसंगी बोलताना मंत्री मकरंद पाटील यांनी नगरपरिषदेच्या कामाचे कौतुक केले. ते म्हणाले, महाबळेश्वरचे ऐतिहासिक महत्त्व टिकवून ठेवत शहराचा आधुनिक विकास करणे ही काळाची गरज आहे.

नगरपरिषदेने निर्माण केलेल्या या सुविधांमुळे पर्यटनाला निश्चितच मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमास नगराध्यक्ष सुनील शिंदे, उपनगराध्यक्ष नासिर मुलाणी, पंचायत समिती सभापती सौ शंकृतला चोरमले मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्यासह नगरसेवक संजय जंगम, अफझल सुतार, रोहित ढेबे, संतोष शिंदे, राहुल पिसाळ, रविंद्र कुंभारदरे, संतोष आखाडे, किसन शिंदे आणि नगरसेविका विमलताई पार्टे, संगीता वाडकर, विद्या बावळेकर, पल्लवी कोंढळकर, प्रियंका वायदंडे, रेश्मा ढेबे, स्मिता पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# निफाड तालुक्यातील निवासी अतिक्रमणे होणार नियमित; प्रशासनाकडून विशेष मोहीम सुरू

## ८ मे पर्यंत अर्ज करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण धारकांसाठी दिलासादायक बातमी आहे. महसूल व वन विभागाने तालुक्यातील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन केले असून, यासाठी पात्र लाभार्थ्यांनी८ मे २०२६पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रांताधिकारीडॉ. शशिकांत मंगरुळेयांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २२ एप्रिल) ऑनलाइन बैठक पार पडली.

या बैठकीस तहसीलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, मुख्याधिकारी किरण देशमुख, श्रिया देवचक्के, धिरज भामरे आणि भूमी अभिलेख उपअधीक्षक राजेंद्र भाबड उपस्थित होते.

**योजनेचे महत्त्वाचे निकष आणि अटी :-**

पात्रता :- १ जानेवारी २०११ पूर्वीची आणि सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जातील.क्षेत्रफळ मर्यादा:

*५०० चौ. फुटांपर्यंत :- पूर्णपणे विनामूल्य नियमित केले जाईल.५०० ते १५०० चौ. फूट:अतिरिक्त क्षेत्रावर बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाईल.

१५०० चौ. फुटांपेक्षा जास्त :- अशी अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत.

वापर :- संबंधित जागा केवळ स्वतःच्या निवासासाठी वापरलेली असावी.मालकी हक्क:नियमित केलेली जमीन पती-पत्नीच्या संयुक्त नावाने'भोगवटादार वर्ग-२'म्हणून दिली जाईल. पुढील ५ वर्षे या जमिनीची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

शपथपत्र :- अर्जदाराच्या कुटुंबाच्या नावावर संपूर्ण महाराष्ट्रात केवळ एकच अतिक्रमण असल्याचे शपथपत्र देणे अनिवार्य आहे.

येथे करा अर्ज :- ग्रामीण भागातील नागरिकांनी आपले अर्ज संबंधित ग्रामसेवकांकडे, तर नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांनीमुख्याधिकाऱ्यांकडेविहित मुदतीत जमा करावेत.

या जमिनींवरील अतिक्रमणे नियमित होणार नाहीत :- गायरान, नदी-नाले, सार्वजनिक रस्ते, स्मशानभूमी, वन जमीन तसेच धोकादायक क्षेत्रांवरील अतिक्रमणे या योजनेत समाविष्ट नाहीत.

प्रशासनाचा इशारा :- विहित मुदतीत (८ मे पर्यंत) अर्ज न करणाऱ्या किंवा निकषात न बसणाऱ्या अनधिकृत अतिक्रमणांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. तरी पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा.

# परमपूज्य सदगुरू श्री नानामहाराज पुण्यस्मरण महोत्सव उत्साहात संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नागपूर :** परमपूज्य सद्गुरू श्री नानामहाराज तराणेकर यांचा ३३ वा पुण्यस्मरण महोत्सव नुकताच श्री नानामहाराज शिष्य परिवार भक्तमंडळाच्या वतीने अथर्वनगरी-३, बेसा, नागपूर येथे अत्यंत उत्साहात व भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या महोत्सवात भक्तमंडळातील डॉ. मिलिंद इंदूरकर, मीरा इंदूरकर, श्रेयस इंदूरकर, नेहा इंदूरकर, पुष्कर इंदूरकर, इंद्राणी इंदूरकर, नुपूर राजहंस, वेदांग राजहंस, माधव चौंगजकर, राधिका चौंगजकर, विनायक काळे, वैशाली काळे, सुहास जोशी, संध्या जोशी, रवींद्र भालेराव, अंजली भालेराव, गणेश गोठले, कल्पना गोठले, शिरीष अपराजित, स्वरूपा अपराजित, विनय तांबोळी, श्रुती तांबोळी, विभोर अपराजित, चिन्मय अपराजित, सतीश अपराजित, नीलिमा अपराजित, संदीप गव्हाणकर, विनोद गव्हाणकर, ज्योत्स्ना गव्हाणकर, श्री व सौ. देशपांडे, श्रद्धाताई इंदूरकर तसेच समस्त नानामहाराज भक्तपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळी ७ वाजता काकडा आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर रागदारीत प्रभाती व भक्तिभजनांचे सादरीकरण करण्यात आले. जागो मोहन प्यारे, जागिये रघुनाथ कुँवर, उठीउठीबा श्री गुरुवरा, उठ पंढरीच्या राया, भेटीलागे माझे, गुरुजी एक निरंजन, जाग जाग प्रभो, श्री गुरूसारिखा, गुरुनामाची ओढ आदी भजनांनी वातावरण भक्तिमय झाले.

यानंतर वेदशास्त्रसंपन्न श्री नुपूर शास्त्री राजहंस व श्री श्रीपाद शास्त्री तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली सद्गुरू श्री नानामहाराजांच्या पादुकांवर रुद्राभिषेक विधीपूर्वक संपन्न झाला. याच वेळी मार्तंडमहिमा पोथीचे चक्रीपारायण तसेच दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या महामंत्राचा एक्का करण्यात आला.

नेहा इंदूरकर यांनी श्री मार्तंडमहीमा या श्री नानांच्या चरित्र ग्रंथातील अवतरणिकेचा १९ वा अध्याय राग 'सरस्वती' मध्ये सादर केला. त्यानंतर महाआरती होऊन महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

दुपारी ३ वाजता भजन कार्यक्रमास प्रारंभ झाला. डॉ. मिलिंद इंदूरकर व भक्तमंडळाच्या गायकवृंदाने जय जय रामकृष्ण हरी, रूप पाहता लोचनी, सुंदर ते ध्यान, सद्गुरू सारिखा, तांडव नृत्यकरी, दत्तांचा अभंग, ओ सद्गुरु राया, वाचे विठ्ठल गाईन, कान्होबाची संगती, देहुडा चरणी, पोवाडा, योगीराज श्री मार्तंडनाथा आदी भजने भावपूर्ण सादर केली. सायंकाळी ६.३० वाजता करुणात्रिपदी व समारोपाची आरती झाली आणि महोत्सवाची सांगता झाली. मोठ्या संख्येने उपस्थित भक्तगणांच्या साक्षीने श्री सद्गुरू नानामहाराजांचा पुण्यस्मरण महोत्सव साग्रसंगीत व अत्यंत भक्तिभावाने पार पडला.

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त सत्यशिल बौद्ध विहार विविध कार्यक्रमाचे आयोजन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सत्यशिल बौद्ध विहार येथे इंजिनिअर चेतन बेले यांचे समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समाज प्रबोधनातुन माणुस घडतो व देशालाच नवे तर संपूर्ण जगासाठी आपला संविधान किती महत्त्व पुर्ण आहे याची जाण होते असे प्रतिपादन इंजिनिअर चेतन बेले यांनी आपल्या समाज प्रबोधन कार्यक्रमातुन सांगितले. या समाज प्रबोधन कार्यक्रमाला महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब बोरकर, अमरचंद जैन, प्रकाश लांजेवार, पृथ्वीराज बागडे , धिरज देशभ्रतार, प्रकाश लांजेवार, भीमराव आवळे, राहुल बागडे, राजेश खंडारे, भीमराव तागडे, राजेश देशभ्रतार, किशोर बनसोड, सुरेंद्र वाहने, राजेंद्र शेंडे, अजय ढोरे, विठ्ठल झोडापे, अभय मिश्रा, केशव पानतावणे, मयुर तिरपुडे, उत्सव कमेटीचे अध्यक्ष राजेंद्र मेश्राम, सविता नारनवरे तसेच महिला मंडळाच्या अध्यक्षा गंगाबाई लोखंडे, किरणताई शेंडे, अंतकलाताई गाडेकर आदीं मान्यवर उपस्थितीत होते. भिम गिताने व प्रबोधनाने चेतन बेले यांनी नागरिकांची मने जिंकली. समाज प्रबोधन काळाची गरज असुन विविध कार्यक्रमाच्या नागरिकांनी समाज घडविण्या साठी समाज प्रबोधन कार्यक्रम केले पाहिजे असेही चेतन बेले म्हणाले.

या कार्यक्रमाला सुमारे शेकडो बौद्ध उपासक-उपासिका तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंजिनिअर चेतन बेले यांच्या तडफदार भीमगीतांवर व प्रबोधनावर युवा कार्यकर्ते उत्साहाने सहभागी होते. कार्यक्रमाचे आयोजन सत्यशील बौद्ध विहार,आईसाहेब सुर्यकांता खंडारे, मनीषाताई खंडारे, संगीताताई वाकपांजर यांनी केले तर संयोजन राजेश खंडारे व मित्र परिवाराने केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भीम - बुद्ध जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राजेंद्र मेश्राम, उपाध्यक्ष धीरज देशभ्रतार तसेच बंडू शंभरकर, रवी शेंडे, भीमराव पाटील, विकास गेडाम, आशिष धनविजय, अभिषेक शेंडे, धम्मदीप झोडापे, अभय मानवटकर, पवन गजभिये, प्रज्वल राऊत, प्रज्वल लांजेवार, अमित रंगारी, विदित गजभिये, यश देशभ्रतार, अनिकेत लांजेवार, सम्यक लांजेवार, सिद्धांत देशभ्रतार, प्रतीक उके आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी उत्कृष्ट डिजे साउंड व्यवस्था पवन गजभिये यांनी उपलब्ध करून दिली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन वर्षा शेंडे यांनी केले तर शेवटी धीरज देशभ्रतार यांनी आभार प्रदर्शन केले. एकूणच या भव्य कार्यक्रमामुळे सत्यशील बुद्ध विहार परिसरात जल्लोषमय व भीममय वातावरण निर्माण झाले होते.

# थोडक्यात

## सोलापूरच्या यशराज भोसले याचे सीबीएसईमध्ये यश



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२२, पंढरपूर :** सीबीएसई इयत्ता १० वी बोर्ड परीक्षा २०२६ मध्ये संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत उच्च गुण मिळवले असून, काही विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुणांची ही कामगिरी केली आहे. सोलापूरमधील यशराज प्रविण भोसले याने ९९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशातील अव्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये पंजाबमधील फाजिल्का येथील वैभव अरोरा, गुजरातमधील अहमदाबाद येथील अमोलिक पंडिता आणि ओडिशातील भुवनेश्वर येथील आयुष्यमान मोहापात्रा यांनी १०० टक्के गुण मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. निकालांवर प्रतिक्रिया देताना फिजिक्सवालाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे म्हणाले, 'हे यश सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सक्षम शैक्षणिक प्रणालीचे प्रतीक आहे. यावर्षी सीबीएसई इयत्ता १० वी परीक्षेसाठी २५ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते. या निकालातून शैक्षणिक यशामध्ये ऑनलाइन आणि हायब्रिड शिक्षणाच्या वाढत्या प्रभावाची नोंद घेतली जात आहे.

## बेलमंडळ शिवारामध्ये वादळी वाऱ्यामुळे शेतातील सोलार चे प्रचंड नुकसान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मौजे बेलमंडळ येथे दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. यामध्ये काही शेतातील शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्यावरील पत्र सुद्धा उडून गेलेले आहेत व काढायला आलेल्या गव्हाची खूप नासाडी झालेली आहे. दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुटलेल्या सुसाट्याच्या वाऱ्याने व वादळी पावसाने गोर्लेगाव येथील रहिवाशी असणारे शेतकरी विठ्ठल सटवाराव कदम यांच्या बेलमंडळ येथील शेत सर्वे क्रमांक ३०/अ मध्ये बसवण्यात आलेल्या जीके एनर्जी या सोलार कंपनीचे सोलार पॅनल सुसाट्याच्या वाऱ्यामध्ये उडून गेल्याने त्यांची ३ सोलर पॅनल फुटून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी सोलार कंपनीकडून सोलर पॅनल बदलून मिळावे ही मागणी केलेली आहे.

## जिल्ह्यातील एकही बालक उपचारापासून वंचित राहू नये, हाच आमचा संकल्प : आ. जोरगेवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** प्रत्येक आई-वडिलांसाठी त्यांचे मूल हेच सर्वस्व असते. त्या मुलाच्या चेहऱ्यावरचे हसू टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन काम करणे हीच खरी समाजसेवा आहे. आपल्या जिल्ह्यातील एकही बालक उपचारापासून वंचित राहू नये, हा आमचा ठाम संकल्प आहे, असे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

आ. किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर महानगरच्या वतीने तसेच किम्स रुग्णालय, मुंबई आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर यांच्या सहकार्याने २० एप्रिल रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात १८ वर्षांखालील बालकांसाठी मोफत हृदयरोग तपासणी, २ डी इको आणि शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, किम्स रुग्णालयाचे डॉ. एल. श्रीनिवास, डॉ. नमिता बॅनर्जी, भारतीय जनता पक्षाचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री नामदेव डाहुले, सुमित बेले, कौसर खान, भाग्यश्री हांडे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक बालक निरोगी राहावे, हीच आमची खरी इच्छा आणि जबाबदारी आहे. अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे गरजू कुटुंबांना आपल्या मुलांच्या उपचारांसाठी मोठा संघर्ष करावा लागतो. अशा वेळी हा उपक्रम त्यांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरत आहे. ते पुढे म्हणाले की, या शिबिराच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांकडून लहानग्यांची सखोल तपासणी होत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. केवळ तपासणीच नव्हे, तर गरज असलेल्या बालकांना पुढील उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी योग्य मार्गदर्शनही दिले जात आहे. आतापर्यंतच्या या उपक्रमाचा आढावा घेत त्यांनी सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून आजवर २२८ हून अधिक बालकांवर नामांकित रुग्णालयांमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, अनेक महागड्या शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्या आहेत. हे कार्य केवळ आरोग्य सेवा नाही, तर अनेक कुटुंबांना नवे जीवन देणारे आहे.

**२७ बालकांवर मुंबईत नि:शुल्क शस्त्रक्रिया**

मागील शिबिरात शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या सर्व बालकांची या शिबिरात पुनर्तपासणी करण्यात आली असून ती सर्व बालके पूर्णतः निरोगी असल्याचे निष्पन्न झाले. तर या शिबिरात तपासणीसाठी आलेल्या २१० बालकांपैकी २७ बालकांच्या हृदयात छिद्र आढळून आले आहे. या सर्व बालकांवर मुंबई येथील किम्स रुग्णालयात निशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यांच्या प्रवास, निवास आणि भोजनाची संपूर्ण व्यवस्था आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

**मुंबईहून २ डी इको मशीनद्वारे तपासणी**

चंद्रपूरमध्ये २ डी इको मशीन उपलब्ध नसल्यामुळे बालकांच्या हृदयातील दोषांचे अचूक निदान करणे कठीण होते. त्यामुळे या शिबिरासाठी मुंबईहून विशेष २ डी इको मशीन आणण्यात आले होते. या अत्याधुनिक यंत्राद्वारे बालकांची अचूक तपासणी करण्यात आली.